विद्यापीठाचे परिसरातील व अधिनस्त महाविद्यालयांमधील कॅंटीन, मेस, उपहारगृहे व इतर अन्न व्यवसाय आस्थापनांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ मधील कलम ३१ अन्वये नोंदणी परवाना घेणे व Schedule-४ मधील स्वच्छता व आरोग्य विषयक आवश्यकतांचे पालन करण्याबाबत..

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
# कृषि नगर, अकोला ४४४ ००१

वाचा - आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.रा., मुंबई यांचे पत्र .क्र.असुमाका/पत्र/१३३६/२०२६/७, दि. १०/०८/२०२६.

## परिपत्रक:-

**जा.क्र साप्रवि /अन्नसुरक्षामानदे/परि./579/२०२६**

**दि २४/०९/२०२६**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सुचित करण्यात येते की, अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य, श्री. तुकाराम मुंढे, भा.प्र.से. यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांना वरील संदर्भीय पत्रान्वये विद्यापीठ, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व वसतिगृहांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कॅंटीन, मेस, उपहारगृह, फूड कोर्ट, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे व तत्सम अन्न व्यवसाय आस्थापनांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ मधील कलम ३१ अन्वये नोंदणी परवाना घेणे व Schedule-४ मध्ये नमूद केलेल्या स्वच्छता, आरोग्यविषयक व अन्न हाताळणी संबंधी सर्व आवश्यकतांचे पालन करणे अनिवार्य आहे असे निर्देश प्राप्त झाले आहेत.

करीता विद्यापीठातील सर्व संबंधित कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख, सहयोगी अधिष्ठाता व त्यांचे अधिनस्थ सर्व आस्थापनांनी संदर्भीय पत्रान्वये खालीलप्रमाणे खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

| | |
|---|---|
| १. | परिसराची स्वच्छता: स्वयंपाकगृह, जेवण हॉल व परिसर दररोज निर्जंतुकीकरण करणे |
| २. | पाणीपुरवठा: केवळ BIS मानांकित पिण्यायोग्य पाणी वापरणे, Water Test Report ठेवणे. |
| ३. | अन्नाची स्वतंत्र हाताळणी: व्हेज/नॉन-व्हेज, कच्चे/तयार अन्नासाठी वेगवेगळे चॉपर, सुरी व भांडी यांचा वापर करावा. |
| ४. | कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वच्छता: सर्व कामगारांचे वार्षिक वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र, हॅंड ग्लोव्हज, बंधनकारक राहील. |
| ५. | कीटक नियंत्रण: Pest Control चे नियमित रेकॉर्ड ठेवणे. |
| ६. | कचरा व्यवस्थापन: ओला व सुका कचरा वेगळा, झाकण असलेले डस्टबीन प्रत्येक मेस कॅंटीनने स्वतंत्र ठेवणे व त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणे शिळे अन्न उघडयावर टाकु नये. |
| ७. | उपकरणांची स्वच्छता: भांडी, फ्रीज, ओव्हन यांची स्वच्छता ठेवणे |
| ८. | विद्यार्थ्यांच्या प्रत्येक मेस/कॅंटीनने स्वतःचा लेखी स्वच्छता आराखडा तयार करणे |

सबब अन्न व औषध प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून तपासणी/मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात याव्यात.

तसेच सर्व संबधितांना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व खाद्यपदार्थ विक्री करणारी आस्थापना दुकाने/कॅंटीन/मेस/उपहारगृह चालवणारी ठेकेदार /कंत्राटदार यांचेकडुन FSSAI नियमांचे पालन होत आहे किंवा नाही याची खात्री करुन याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची दक्षता घेण्यात यावी, तसेच याबाबतची सर्व जबाबदारी संबधित अधिकारी आणि कार्यालय प्रमुख/ वसतीगृह अधिक्षक यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

सदर बाबीस प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ व गुणवत्तापूर्ण अन्न उपलब्ध होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. कसूर झाल्यास संबधितास जबाबदार धरण्यात येईल.

उपरोक्त परिपत्रक विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

स्वा/-
प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)------------------------------------------------
४. विभाग प्रमुख (सर्व)-------------------------------------- डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्रे (सर्व) ---------ARIS Cell----------------------
६. वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्र (सर्व)--------------------------------------
७. नियंत्रक,/विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल . पं.दे.कृ. वि., अकोला.
८. मा. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीकरीता.
९. उपकुलसचिव आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग / वि.वि. डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला
१०. मुख्य वसतीगृह अधिक्षक, अकोला मुख्यालय अकोला.

प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 368
Dt.: 28/09/26

Order-M (I)